IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# रायगड जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान व महत्व

**सुरेश सुदाम दुंडे**
वसंतराव नाईक कला ,वाणिज्य महाविद्यालय व बॅरिस्टर ए,आर अंतुले विज्ञान महाविद्यालय, म्हसळा, ता म्हसळा,जि,रायगड
sureshdunde@gmail.com

**सारांश** :
पर्यटन हा जगातील एक वेगाने वाढणारा व्यवसाय आहे पर्यटनाचे विविध महत्व ओळखून जगातील अनेक देशांनी या व्यवसायाकडे लक्ष पुरविले.पर्यटनामुळे रोजगार निर्मिती बरोबरच देशाला परकीय चलन मिळते आर्थिक विकास होण्यास मदत होते .

**प्रस्तावना**

.प्राचीन काळात मानव अन्न वस्त्र निवारा यांच्या शोधात भटकत होता . मानवाने आपल्या बुद्धीच्या व तर्काच्या जोरावर सातत्याने परिवर्तनात व विकास घडून आणला आहे पर्यटनाचे मूळ इतिहासात आढळते पर्यटन म्हणजे ''एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे असा होतो'' पर्यटकदेखील विविध ठिकाणच्या स्थळांना भेटी देऊन, ऐतिहासिक ,धार्मिक ,सामाजिक ,सांस्कृतिक,नैसर्गिक घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.भारताला प्रसिद्ध ऐतिहासिक ,धार्मिक ,सामाजिक ,सांस्कृतिक,नैसर्गिक घटक लाभले असल्यामुळे भारतातील पर्यटनास पूर्वी पासून महत्व आहे.त्या बरोबरच महाराष्ट्राला देखील ऐतिहासिक ,धार्मिक ,सामाजिक ,सांस्कृतिक,नैसर्गिक जगप्रशिद् लेण्या लाभयला आहेत . रायगड जिल्हा हा पर्यटनाच्यादृष्टीने महाराष्ट्रातील महत्वाच्या जिल्हया पैकी एक जिल्हा आहे . रायगड जिल्ह्यास अनेक प्रसिद्ध ऐतिहासिक धार्मिक व नैसर्गिक स्थळे लाभले असून शिवाजी महाराज याच्या राजधानीचे ठिकाण असल्यामुळे जिल्ह्यास महत्व आहे एकोणिसाव्या शतकात झालेल्या पायाभूत विकासामुळे पर्यटनाचे स्वरूप बदलले पर्यटन हे एक मुख्य व्यवसाय बनला आहे. भारतातील अनेक्त राज्याच्या अर्थव्यवस्था ह्या पर्यटनावर अवलंबून आहेत . भारताने प्रत्येक पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे त्यामुळे भारतातील पर्यटन स्थळांचा विकास होण्यास मदत झाली आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे :**

अभ्यास विषयाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत

1. रायगड जिल्ह्यातील पर्यटनाचे महत्व अभ्यासने
2. रायगड जिल्ह्याच्या पर्यटन स्थळांचा विकासाचा अभ्यास करणे

**संशोधन पद्धती** :

अभ्यास विषयासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या माहितीचा वापर करण्यात आलेला असून प्राथमिक माहिती प्रश्नणवली च्या मध्यमातून व स्थळांना भेट देऊन संकलित करण्यात आली आहे .दुय्यम माहिती विविध विषयासी संबंधित संदर्भ ग्रंथ ,अहवाल संबंधित संकेतस्थळ याचा आधार घेण्यात आला आहे

**पर्यटनाच्या व्याख्या.**

जागतिक पर्यटन संस्था (World Tourism Organization) '

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

''जे लोक प्रवास करून आपल्या परिसराबाहेरील ठिकाणी जाऊन सलग एक वर्षापेक्षा कमी काळ ,करमणूक , काम वा इतर कारणांसाठी रहातात ते' म्हणजे पर्यटन ''

**पर्यटनाची व्याप्ती :**

जागतिक पर्यटन हे अगदी सुरवातीच्या शतकापर्यंत पर्यटन शोधकार्य व व्यापार यासाठीच होत असे .विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जगात रस्ते, रेल्वे ,हवाई वाहतूक ई विकास झाला त्यामुळे पर्यटन क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला . पर्यटक जगाच्या विविध महत्वाच्या स्थळी भेट देत आहेत .त्याच बरोबर पर्यटनातील सामाजिक पर्यटन ,कृषी पर्यटन ,निसर्ग पर्यटन ,साहसी पर्यटन ,शैक्षणिक पर्यटन नवीन कल्पनाचा उदय झाला आहे म्हणून पर्यटनाची व्याप्ती आणखी वाढत आहे .

**जागतिक पर्यटन विकास** :

पर्यटनाचे कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी जागतिक पातळीवर राष्ट्रीय पातळीवर राज्य पातळीवर अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. जागतिक पातळीवर जागतिक पर्यटन संघटना (World Tourism organization) संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संघटना (United Nations world Tourism Orgnisation & (UNWTO) राष्ट्रीय पातळीवर Indian Tourism Development Corporation (ITDC) राज्य पातळीवर Maharashtra Tourism Development Corporation (MTDC) त्या मार्फत पर्यटन स्थळांचा विकास व्हावा, पर्यटनाच्या संधी निर्माण करणे ,पर्यटकांना पर्यटनाबद्दल माहिती मिळावी, पर्यटकांना उत्तम प्रकारच्या सेवा व सुविधा उपलब्ध करून देणे ई कार्य करतात .

**भारतातील पर्यटनाचे महत्व**

भारताला हजारो वर्षांची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभली आहे .भारतात प्रशिद्द असे प्राचीन मध्ययुगीन वास्तू, स्मारके,किल्ले राजवाडे ,लेण्या धार्मिक स्थळे , मंदिरे पहावयास मिळतात आज ती ठिकाणे पर्यटन स्थळे झाली आहेत . हि स्थळे देश–विदेशातील पर्यटकाना मोठ्या प्रमाणात आकर्षित करतात या स्थळांना भेटी देण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येतात यातून विविध रोजगार निर्माण होतात

तक्ता क्र 1 भारतातील विदेशी पर्यटकाची संख्या ( कोटी मध्ये )

| वर्ष | पर्यटकाची संख्या | वाढ–घट |
|---|---|---|
| 2011 | 6.31 | 0.53 |
| 2012 | 6.58 | 0.27 |
| 2013 | 6.97 | 0.39 |
| 2014 | 7.68 | 0.71 |
| 2015 | 8.03 | 0.35 |
| 2016 | 8.80 | 0.77 |
| 2017 | 10.04 | 1.24 |

| | | |
|---|---|---|
| 2018 | 10.56 | 0.52 |
| 2019 | 10.93 | 0.37 |
| 2020 | 2.74 | -8.19 |
| 2021 | 1.52 | -1.22 |
| 2022 | 6.19 | 4.67 |
| एकूण | 86.35 | 0.41 |

Source Tourism Statistic At a Glance (2022) [Ministry of Tourism] Government of India

तक्ता क्रमांक 1 मध्ये वर्ष 2011 ते 2022 या कालावधी मधील भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकाची संख्या दर्शवली आहे .वर्ष 2011 भारतातील पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या 6.31 कोटी इतकी होती . 2022 मध्ये 6.19 कोटी विदेशी पर्यटकानेभेटी दिल्या

तक्ता क्र .1.2 पर्यटनातून भारताला मिळणारे परकीय चलनः

| वर्ष | परकीय चलन (कोटी मध्ये) | वाढ – घट |
|---|---|---|
| 2011 | 83066 | 16894 |
| 2012 | 95607 | 12541 |
| 2013 | 107563 | 11956 |
| 2014 | 120367 | 12804 |
| 2015 | 134844 | 14477 |
| 2016 | 154146 | 19302 |
| 2017 | 177874 | 23728 |
| 2018 | 194881 | 7008 |
| 2019 | 211661 | 16780 |
| 2020 | 50136 | -166331 |
| 2021 | 65070 | 14,934 |
| 2022 | 134543 | 69,473 |
| एकूण | 1529758 | 53566 |

Source: India Tourism Statistic At a Glance (2022)) [ Ministry of Tourism] Government of India

तक्ता क्रमांक 2 मध्ये वर्ष 2011 ते 2019 या कालावधीत पर्यटनातून भारताला मिळालेल्या चलन प्राप्ती ची आकडेवारी दर्शवली आहे . वर्ष 2011 मध्ये परकीय चलन प्राप्ती 83066 कोटी होती ती 2022 मध्ये 134543 कोटी एवढी झाली

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

**रायगड जिल्हा :**

रायगड महाराष्ट्रातील कोकण विभागातील तील एक महत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो रायगड जिल्ह्याला 240 कि. मी. समुद्रकिनारा लाभला आहे रायगड जिल्हा 17.51 अंश पूर्व रेखांश ते 19.80 अंश उत्तर अक्षांस आणि 72.51 अंश पूर्व ते 73.40 अंश पूर्व रेखांश असा पसरलेला असून .रायगड जिल्ह्यात सुंदर व प्रसिद्ध असे समुद्रकिनारे आहेत. त्याबरोबरच प्रसिद्ध असे ऐतिहासिक किल्ले , धार्मिक तीर्थक्षेत्रे व जगप्रसिद्ध लेण्या आहेत हि स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात . म्हणून जिल्ह्याच्या आर्थिक विकासात पर्यटनाचे योगदान जाणून घेणे महत्वाचे वाटले ..रायगड जिल्ह्यातील पर्यटकाची पसंतीच्या आधारे विषय अभ्यासासाठी धार्मिक ,ऐतिहासिक ,सांस्कृतिक, नैसर्गिक खालील पर्यटन स्थळाची निवड केली आहे

**रायगड किल्ला:**

रायगड किल्ला हा महाड या ठिकाणापासून सुमारे २५ किमी अंतरावर आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्याची पुनर्बांधणी करून त्याला इ. सन १६७४ मध्ये मराठा साम्राज्याची राजधानी म्हणून घोषित केली.हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेला हा किल्ला एक नुसता एक गड नसुन ते एक राष्ट्रीय स्मारक आहे रायगडावर पहाण्यासाठी होळीचा माळ, भवानी मंदीर, जित दरवाजा, खुब लढा बुरुज, महादरवाजा, मिना दरवाजा, राणी वसा, पालखी दरवाजा, राजभवन, राजसभा,गंगासागर, नगारखाना, जगदिश्वर मंदिर, बारा टाकी, वाघदरवाजा, टकमक टोक, रामेश्वर मंदिर व शिवछत्रपतींची समाधी इ. ठिकाणे आहेत. या ठिकाणी देश विदेशातील मोठ्या संखेने लोक भेटी देतात

महाड ( चवदार तळे ) :

महाड हे 'रायगड जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण आहे . पूर्वी महाड हे गाव व्यापाराचे ठिकाण होते. महाड या शब्दाची व्युत्पत्ती महा—हट म्हणजे मोठी बाजारपेठ अशी आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक 20 मार्च 1927 रोजी केलेल्या पाण्याच्या सत्याग्रह चवदार तळे याच ठिकाणी आहे म्हणून महाड हे जागतिक स्तरावर प्रसिध्द आहे येथे 20 मार्च ला देशभरातील लोक प्रचंड संख्येने चवदार तळ्यास भेटी देतात .

**एलिफंटा :**

एलिफंटा लेणी हि रायगड जिल्ह्यातील उरण ताकुक्यात घारापुरी येते आहे. मुंबई पासून 11 किलोमीटर अंतरावर घारपुरी बेटावर आहे . घारापुरी येथील एलिफंटा लेणी ह्या 1887 मध्ये, युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यात आल्या आहेत . एलिफंटा लेणी ह्या मध्ययुगीन वास्तुकलाचा एक भव्य नमुना आहे.येथे हिंदू धर्मासी संबंधित 5 लेण्या आहेत आणि बौध्द धर्मासी संबंधित 2 लेण्या आहेत , सर्वात सुप्रसिद्ध म्हणजे "त्रिमूर्ती" किंवा तीन मुखी भगवान शिव होय या मूर्तीला गंगाधर म्हणूनही ओळखले जाते ..

**जंजिरा किल्ला**

जंजिरा किल्ला हा रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यात राजापुरी गावा जवळ आहे जंजिरा किल्याचे नाव अरबी शब्दापासून पडले जझीरा म्हणजे एक बेट हा किल्ला या किल्ल्याच्या चारही बाजूने पाणी आहे . जंजिरा किल्यावर 20 सिद्धी शासक होऊन

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

गेले शेवटचा शासक सिद्दी मोहम्मद खान होता शेवट पर्यंत किल्ल्यात सिद्दिची सत्ता अबाधित राहिली आज ही किल्याची तटबंदी भक्कम आहे किल्यात राजवाडा ,गोड्या पाण्याची विहीर ,धान्याचे कोठारे ,तोफा घरे आहेत हा किल्ला पर्यटकाचे प्रमुख आकर्षक केंद्र आहे या स्थळी मोठ्या संखेने या ठिकाणी पर्यटक भेटी देतात.

माथेरान :

माथेरान हे रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण असून ते अतिशय प्रसिद्ध आहे. याचे कारण म्हणजे हे ठिकाण त मुंबई आणि पुणे पासून सर्वात जवळचे आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेले ठिकाण आहे . तेथे अनेक नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासाठी ठिकाणे आहेत माथेरान हे इंग्रजांनी वसवले त्यामुळे तेथील पॉइंटला इंग्रजाने नावे दिलेली आहेत , अनेक पॉइंट बघण्यासारखे आहेत तसेच तेथे पशु,प्राणी औषधी वनस्पती आहेत माथेरानला गिरिस्थाननगरपरिषदेचा दर्जा मिळालेला आहे. माथेरानला भेट देण्यासाठी मोठ्या संखेने देशी व विदेशी पर्यटक येतात

कर्नाळा पक्षीअभयारण्य :

कर्नाळा पक्षी अभयारण्य हे रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात असून . मुंबई–गोवा महामार्गाला लागून हे अभयारण्य आहे. महाराष्ट्र शासनाने 1968 मध्ये या ठिकाणास पक्षी अभयारण्य म्हणून घोषित केले येथे विविध प्रकारचे वनस्पती ,पृक्ष असून कर्नाळा परिसरात पक्ष्यांच्या अनेक जाती प्रजाती व दुर्मिळ पक्षी आढळतात . पर्यटक , निसर्गप्रेमी , अभ्यासक या स्थळास भेटी देतात

श्री बल्लाळेश्वर, पाली :

बल्लाळेश्वर मंदिर हे रायगड जिल्ह्यातील पाली तालुक्यात आहे .हे मंदिर अष्टविनायक मंदिरांपैकी एक असून अष्टविनायकातील तिसरा गणपती पाली बल्लाळेश्वर ओळखला जातो . अष्टविनायकातील एकमेव गणपती आहे कि जो भक्ताच्या बल्लाळ या नावाने प्रशिद्ध आहे ..स्थळास देशभरातील लोक मोठ्या श्रद्धेने येतात .

**श्री वरदविनायक महड :**

महाराष्ट्रातील अष्टविनायकाची जी स्थाने प्रसिद्ध आहेत त्यातील चौथा असलेला गणपती म्हणून महाडचा वरदविनायक ओळखला जातो येथील मूर्ती स्वयंभू असून धोंडू पौढकर यांना ती येथील तलावात 1690 साली सापडली .हे ठिकाण रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात महड येथे आहे हा गणपती अष्टविनायका पैकी एक असल्याने या ठिकाणी पर्यटकाची, भक्ताची आणि भाविकांची सतत गर्दी असते.

**श्री हरिहरेश्वर:**

हरिहरेश्वर हे रायगड जिल्ह्याचे श्रीवर्धन तालुक्यातील एक धार्मिक व प्रेक्षणिक ठिकाण आहे . हरिहरेश्वर हे दक्षिणेकडील शेवटचे टोक आहे . हरिहरेश्वर हे दक्षिण काशी'' म्हणून ओळखले जाते .हे तीर्थक्षेत्र श्रीवर्धनपासून सुमारे 16 कि. मी अंतरावर आहे हरिहरेश्वर भाविकांचे श्रद्धास्थान तसेच पर्यटकांसाठी देखील स्थानाबद्दल प्रचंड आकर्षक आहे .

**दिवेआगर (सुवर्ण गणेश मंदिर )**

दिवेआगर हे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील एक अगदी रेखीव गाव असून समुद्रकिनारी वसलेल आहे.. सन 1060 चा दिवेआगर ताम्रपट हा पहिला मराठी ताम्रपट म्हणून प्रसिद्ध आहे. दिवेआगर गावावर अरबी चाच्यांचे समुद्रमार्गे हल्ले होत असे त्यांत कित्येक मंदिरे देखण्या मूर्ती नष्ट झाल्या . त्याच काळात सुवर्णगणपती प्रतिमा जमिनीत पुरून ठेवली गेली. सुवर्णगणपतीचा दाक्षिणात्य शैलीचा अजोड कोरीव मुखवटा 1998 साली प्रकट झाला. परंतु सुवर्ण गणेश मुखवटा 2012 साली चोरीला गेली .या स्थळास भेटी देण्यासाठी साठी देशभरातील अनेक लोक भेटी देण्यासाठी येतात

**श्रीवर्धन**

.श्रीवर्धन हे दक्षिण रायगडचे टोक असून बालाजी विश्वनात भट यांचे हे जन्मगाव आहे . नैसर्गिक सौन्धार्याचे परीपूर्ण असे ठिकाण. श्रीवर्धनला भव्य समुद्रकिनारपट्टी लाभली आहे. गावाची नगररचना खूप आखीवरेखीव आहे. बहुतेक रस्ते एकमेकांना समांतर असे आहेत. गावाचा विस्तार सुमारे 4.2 चौ.कि.मीटर आहे. गावात सर्व जाती– जमाती आणि धर्माचे लोक राहतात .श्रीवर्धन येथील देवस्थान म्हणजे सोमजाई माता मंदिर आणि "श्रीलक्ष्मीनारायण' मंदिर होय .

**रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास :**

पर्यटन क्षेत्र हे आंतरराष्ट्रीय वाणिज्य क्षेत्रांमधील मुख्य क्षेत्रांपैकी एक आहे आणि अनेक विकसनशील देशांमधील मुख्य आर्थिक स्त्रोतांपैकी एक आहे. पर्यटन हे आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते याचे महत्व ओळखून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी ,रोजगाराच्या संधीत वाढ करण्यासाठी पर्यटनाचा विकास करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र पर्यटन धोरण निश्चित केले आह

**रायगड जिल्ह्यातील झालेला बदल**

वर्ष 2011 मध्ये जिल्ह्याची लोकसंख्या 2208000 होती तर वर्ष 2021 मध्ये त्यात वाढ होऊन 2634200 .झाली वर्ष 2011 मध्ये जिल्ह्यात विद्युतीकरण झालेले गावे 1696 होती तर वर्ष 2021 मध्ये 1858 इतकी विद्युतीकरण झालेले गावे आहेत .जिल्ह्यात 299 कि . मी चा रेल्वे मार्ग आहे .वर्ष 2021 मध्ये जिल्ह्यातिल रस्ते 5593 कि . मी होती तर वर्ष 2021 मध्ये त्यात वाढ होऊन जिल्ह्यातिल रस्ते 8103 कि . मी झाले .वर्ष 2011 मध्ये जिल्ह्यात बँकांचीची संख्या 368 होती तर वर्ष 2011 मध्ये त्यात वाढ होऊन बँकांची संख्या 456 वाढ झाली . वर्ष 2011 मध्ये जिल्ह्यात पर्यटन स्थळांची ची संख्या 62 होती तर वर्ष 2021 मध्ये त्यात वाढ होऊन पर्यटन स्थळांची संख्या 102 झाली .

रायगड जिल्ह्यात सुंदर व प्रसिद्ध असे नैसर्गिक ,ऐतिहासिक किल्ले , धार्मिक तीर्थक्षेत्रे व जगप्रसिद्ध लेण्या आहेत हि स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात . रायगड हा औद्योगिक जिल्हा आहे . रायगड जिल्ह्यातील काही निवडक पर्यटन स्थळांचा पायाभूत विकास झाला आहे त्यात दळणवळण, बँकिंग सेवा , MTDC निवास सुविधा . हॉटेल ,लॉज,भोजनालय , पाणीपुरवठा विद्युतीकरण आणि पार्किंगची सुविधा उपलब्ध आहेत . रायगड जिल्ह्यातील पर्यटन स्थळाच्या विकासास आणखी वाव आहे आधुनिक सुख सुविधांचा विकास झाला तर रायगड एक पर्यटन केंद्र होऊ शकते

**निष्कर्ष :**

जिल्ह्यातील पर्यटन स्थळाच्या विकासास वाव आहे . पर्यटनामुळे पायाभूत सुविधा ,दळणवळण, बँकिंग ,निवास हॉटेल ,लॉज,भोजन सुविघाचा विकास होतो तसेच त्या त्या भागातील लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊन सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होते.पर्यटनासी निगडीत वाहतूक व्यावसायिक ,ऑटो ,टक्सी , पर्यटन मार्गदर्शक ई रोजगार निर्माण होतो . स्थानिक वस्तूला मागणी निर्माण होऊन स्थानिक बाजार पेठेचा विकास होतो .पर्यटनामुळे देशाला परकीय चलन मिळते

**संदर्भ सूची :**


1. संभाजी पाटील – पर्यटन व्यावाथापन व पर्यटन उद्योग
2. विठ्ठल घारपुरे –पर्यटन भूगोल
3. रायगड जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन (2022)
4. India Tourism Statistic At a Glance (2023) Ministry of Tourism] Government of India

5. श्रीनिवास घैसास – समग्र कोंकण दर्शन
6. www.zpraigad.in
7. महाराष्ट्र पर्यटन धोरण 2016
8. www-Wikipedia.org.in